

पुनावळेतील कचरा डेपोचे आरक्षण रद्द

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत** वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक २३/05/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 114 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# अजित पवारांचा संताप

## आरोपींना लवकरात लवकर बेड्या ठोका!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) नेते राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवीने १६ मे रोजी आत्महत्या केली आहे. तिचा हुंड्यासाठी सासरकडच्या मंडळींकडून छळ केला जात होता असा आरोप वैष्णवीच्या पालकांनी केला आहे. दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वैष्णवीच्या आई-वडीलांशी फोन द्वारे संवाद साधला. संवाद साधत असताना अजित पवार यांनी संताप व्यक्त केला आहे.**



राजेंद्र हगवणे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आहेत. त्यांची आज पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. त्यानंतर अजित पवार यांनी वैष्णवीच्या आई- वडिलांशी फोनद्वारे संवाद साधला. तसेच वैष्णवीच्या सासरकडच्या मंडळींवर कौटुंबिक हिंसाचाराचेही आरोप केले आहेत. दरम्यान, या प्रकरणामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख व उपमुख्यमंत्री अजित पवारांवरही टीका होत आहे. यावर आज पहिल्यांदाच अजित पवारांनी भाष्य केलं. तसेच त्यांनी राजेंद्र हगवणेंवरील संताप व्यक्त केला.पवार म्हणाले, माझा त्यांच्याशी काहीही संबंध नाही. उलट मला कळाल्यानंतर त्या आरोपींना लवकरात लवकर बेड्या ठोका असं पोलिसांना सांगितलं. आरोपीला शोधण्यासाठी तीन टीम लावल्या होत्या, आणखी तीन टीम वाढवायला सांगितल्या आहेत. सगळी कलम लावण्यास सांगितले आहेत.

त्याला सोडणार नाही. एकीकडे प्रेम विवाह करतात आणि दुसरीकडे असे वागतात हरामखोर आहेत. मी तुमच्यासोबत आहे. तुमच्या मुलीच्या बाजूने आहे. असा विश्वास यावेळी अजित पवारांनी व्यक्त केला.

# दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा २४ जून ते १६ जुलै या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा २४ जून ते ८ जुलै या कालावधीत घेतली जाणार आहे.राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य मंडळाने ५ मे रोजी बारावीचा, तर १३ मे रोजी




दहावीचा निकाल जाहीर केला.या परीक्षांतील अनुत्तीर्ण, एटीकेटी प्राप्त विद्यार्थी, श्रेणी सुधार करू इच्छिणारे विद्यार्थी यांना संधी मिळण्यासाठी पुरवणी परीक्षा घेतली जाणार आहे. आतापर्यंत पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्टमध्ये घेतली जात होती. मात्र, यंदा ही परीक्षा लवकर घेतली जाणार आहे.सविस्तर वेळापत्रक https://www.mahahsscboard.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.राज्य मंडळाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, २४ जून ते ११ जुलै या कालावधीत बारावीची प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. बारावीच्या माहिती तंत्रज्ञान आणि सामान्यज्ञान या विषयांची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने अनुक्रमे १५ जून, १६ जून रोजी घेतली जाणार आहे. तर २४ जून ते ८ जुलै या कालावधीत दहावीचे प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन केले जाणार आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक २३/05/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पुनावळेतील कचरा डेपोचे आरक्षण रद्द

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुनावळे : महापालिकेने पुनावळे येथील वन विभागाच्या जागेवर सन २००८ मध्ये टाकलेले कचरा डेपोचे आरक्षण स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधींच्या तीव्र विरोधामुळे रद्द केले आहे. या जागी व्यावसायिक गाळे, कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याचे आरक्षण नवीन विकास आराखड्यात टाकण्यात आले आहे.भविष्याची गरज ओळखून महापालिकेने पुनावळे येथे २००८ मध्ये २२.८ हेक्टर जागेवर कचरा डेपोचे आरक्षण टाकले होते. हिंजवडी, पुनावळे, मारुंजी, ताथवडे या गावांच्या मध्यभागी ही




वन विभागाची जागा आहे. आरक्षण टाकताना पुनावळे भागात नागरीकरण झाले नव्हते. परंतु, मागील १७ वर्षांत या परिसरात गगनचुंबी इमारती उभारल्या. प्रचंड नागरीकरण झाले.नैसर्गिक वातावरण, बाजूला असलेली माहिती व तंत्रज्ञाननगरी, शैक्षणिक सुविधांमुळे या भागात राहण्यासाठी पसंती वाढली. परिणामी, एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या झाली.

मागील वर्षी महापालिकेने पुनावळेत कचरा डेपो उभारण्यासाठी हालचाली करताच नागरिकांनी तीव्र विरोध सुरू केला. घंटानाद, दुचाकी फेरी, साखळी उपोषण, डेपोच्या जागेवरील झाडांना चिपको आंदोलन केले.

तत्कालीन आमदार अश्विनी जगताप यांनीही विधिमंडळात या विरोधात आवाज उठविला. कचरा डेपोला वाढता विरोध पाहून सरकारने अधिवेशनात डेपोला स्थगिती दिली.

नव्याने करण्यात आलेल्या शहर विकास आराखड्यात डेपोचे आरक्षणच रद्द करण्यात आले आहे.

# 'राजा शिवाजी' 1 मे रोजी जगभरात होणार प्रदर्शित

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

जिओ स्टुडिओज् आणि मुंबई फिल्म कंपनीने आज एक अत्यंत महत्वाकांक्षी घोषणा केली आहे. रितेश देशमुख दिग्दर्शित आणि अभिनीत, भव्य ऐतिहासिक ॲक्शन ड्रामा 'राजा शिवाजी' हा चित्रपट १ मे २०२६ रोजी म्हणजेच महाराष्ट्र दिनाच्या शुभमुहूर्तावर जगभरात प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट मराठी, हिंदी, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम या सहा भाषा आणि त्याचबरोबर जगभरात देखील प्रदर्शित होईल, आणि याच निमित्ताने महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची अतुलनीय शौर्यगाथा भारताच्या आणि जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल.

'राजा शिवाजी' हा चित्रपट महाराष्ट्राच्या अभिमानाचा, नाट्यमय कथेचा आणि उत्कृष्ट निर्मितीचा संगम ठरणार आहे. संजय दत्त, अभिषेक बच्चन, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, भाग्यश्री, फरदीन खान, जितेंद्र जोशी, अमोल गुप्ते, जिनिलीया देशमुख आणि रितेश विलासराव देशमुख यांसारख्या हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकारांची फौज या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.

जागतिक स्तरावर प्रादेशिक चित्रपटांची ताकद आणि क्षमता दाखवणारा हा चित्रपट नक्कीच एक मैलाचा दगड ठरेल अशी अपेक्षा आहे.

'राजा शिवाजी' ही त्या युगाची कथा आहे जेव्हा साम्राज्ये एकमेकांशी भिडत होती, पण सामान्य जनतेला मात्र त्यांच्या अन्यायाची झळ सोसावी लागत होती. आणि याच काळात या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, एका असामान्य अश्या योद्ध्याने, भारतातील शक्तिशाली सत्तेविरुद्ध बंड करून 'स्वराज्य' या संकल्पनेची पायाभरणी केली. 'राजा शिवाजी' हा चित्रपट या संघर्षाचा, शौर्याचा अद्भुत अनुभव देईल असा विश्वास आहे.

सुप्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर संतोष सिवन या चित्रपटाच्या निमित्ताने मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहेत, तर आपल्या संगीताने भारतीय चित्रपटसृष्टीत आपला वेगळा ठसा उमटवणारे संगीतकार अजय-अतुल यांचे संगीत या चित्रपटाला लाभणार आहे.

या चित्रपटाचे चित्रीकरण सध्या मुंबई आणि वाई येथे सुरू आहे.




ज्योती देशपांडे, अध्यक्ष - जिओ स्टुडिओज् (मिडिया आणि कंटेंट बिझनेस - RIL) म्हणाल्या, " "राजा शिवाजी हा केवळ एक चित्रपट नसून, प्रत्येक भारतीयाच्या मनात स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली जाण्याचा एक अभिमानास्पद असा सोहळा आहे.

हे स्वप्न सत्यात उतरवण्याचे सामर्थ्य केवळ अशा व्यक्तीमध्ये असू शकते, ज्याच्या हृदयात या कथेबद्दल निस्सीम आदर आहे. रितेश हेच स्वप्न, जिनिलीयासोबत, उत्कटतेने आणि ध्येयनिष्ठेने साकारत आहे. भारताच्या भूमीत जन्मलेल्या, काही महान व्यक्तिमत्त्वांपैकी एक असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे हे प्रेरणादायी आणि असामान्य कर्तृत्व, भारतापासून ते जगापर्यंत पोहोचवणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. म्हणूनच हा चित्रपट आमच्या सर्वात महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असून भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोत्तम कलाकारांच्या साथीने आम्ही सादर करत आहोत."

दिग्दर्शक आणि मुख्य अभिनेता रितेश विलासराव देशमुख म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ ऐतिहासिक व्यक्तिमत्व नाही, तर ते महाराष्ट्राच्याच नाही तर कोट्यावधी भारतीयांच्या हृदयात जिवंत असलेली भावना आहे.

या अलौकिक व्यक्तिमत्वाची महागाथा मोठ्या पडद्यावर साकारणे ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि जबाबदारीची गोष्ट आहे. ज्योती देशपांडे आणि जिओ स्टुडिओज् यांनी माझ्यावर विश्वास ठेवल्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. आणि आनंदाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्र दिनी हा चित्रपट प्रेक्षकांसमोर येणार आहे. मला खात्री आहे की, ही प्रेरणादायी कथा प्रत्येक भारतीयाच्या मनावर तितकीच खोलवर जोडली जाईल, जितके आम्ही जोडले गेलो आहोत."

जिनिलीया देशमुख, निर्माती, मुंबई फिल्म कंपनी म्हणाल्या, "हा चित्रपट म्हणजे अनेक वर्षांची मेहनत, निष्ठा, आणि निस्सीम आदरातून साकारली जाणारी कलाकृती आहे. 'राजा शिवाजी' हा चित्रपट, पिढ्यानपिढ्या अखंड प्रेरणा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सारख्या महान राजाला मनापासून दिलेली आदरांजली आहे. आमचे हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आम्हाला सक्षम साथ दिल्याबद्दल आम्ही जिओ स्टुडिओजचे मनःपूर्वक आभारी आहोत. ही ऐतिहासिक शौर्यगाथा देशातील आणि जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा हा आमचा एक विनम्र प्रयत्न असणार आहे."

जिओ स्टुडिओज् प्रस्तुत आणि ज्योती देशपांडे व जिनिलीया देशमुख निर्मित 'राजा शिवाजी' चित्रपटाचे दिग्दर्शन रितेश देशमुख यांनी केले आहे. हा चित्रपट १ मे २०२६ रोजी जगभरात सहा भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# पावसाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने अण्णा बनसोडे यांनी घेतला आढावा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : आगामी पावसाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी आढावा घेतला. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामकाज सुरळीत होण्यासाठी नियोजन योग्य करण्याच्या सूचना दिल्या.विधानभवनात पावसाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने तयारी संदर्भात आढावा झाली.

यावेळी सचिव (१) जितेंद्र भोळे, सचिव (२) मेघना तळेकर, सचिव (३) श्री आठवले, (4) शिवदर्शन साठ्ये, सहसचिव नागनाथ थेटे, उपसचिव रविंद्र जगदाळे, अवर सचिव सीमा तांबे, अवर सचिव आशिष जावळे उपस्थित होते.आढावा बैठकीत विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी शाखानिहाय कामकाजाची माहिती जाणून घेतली.

तसेच विनंती अर्ज समिती व सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणे तदर्थ समिती कामाचाही आढावा घेतला.

# राज्यातील शाळांमध्ये शिक्षकांची कंत्राटी भरती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : आदिवासी विभागाने आश्रम शाळांमध्ये शिक्षकांच्या १७९१ मंजूर पदांची सेवा बाह्यस्रोतांद्वारे (कंत्राटी) उपलब्ध करून घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची निविदा प्रक्रिया राबवण्यासाठी ८४ कोटी ७४ लाख ५५ हजार रुपये इतक्या अंदाजित रकमेच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे.आदिवासी विकास विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. १६ नोव्हेंबर २०२२च्या निर्णयाद्वारे आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे. या सुधारित आकृतिबंधानुसार आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळांतील शिक्षकांच्या मंजूर १७९१ पदांच्या सेवा बाह्यस्रोतांद्वारे उपलब्ध करून घेण्यासाठी जीईएम संकेतस्थळावर निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे.बाह्यस्रोतांद्वारे उपलब्ध केल्या जाणाऱ्या शिक्षकांमध्ये २२९ उच्च माध्यमिक शिक्षक, ४५५ माध्यमिक शिक्षक, १२० पदवीधर प्राथमिक शिक्षक, १७८ प्राथमिक शिक्षक इंग्रजी, ८०९ प्राथमिक शिक्षक मराठी यांचा समावेश असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

# ‘राष्ट्रप्रेमी चिंचवडकर’ नागरिकांच्या वतीने 'तिरंगा रॅली'

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



‘ऑपरेशन सिंदूर’ अंतर्गत भारताच्या अत्यंत शूर सैन्य दलांनी पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे नष्ट करून भारतातील माता - भगिनींचे सिंदूर पुसणाऱ्या क्रूर अतिरेक्यांवर भारतीयांना अपेक्षित असा सूड उगवला आहे.

भारताच्या शक्तिशाली सैन्य दलाला नमन करण्यासाठी आणि भरघोस समर्थन देण्यासाठी क्रांतिवीर चापेकर बंधू चौक ते महासाधू मोरया गोसावी क्रीडांगण केशवनगर अशी चिंचवडगाव परिसरात तिरंगा रॅलीचे ‘राष्ट्रप्रेमी चिंचवडकर’ नागरिकांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. या रैलीला चिंचवडकर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रॅलीत चिंचवडगावातील स्थानिक माजी नगरसेवक मोरेश्वर शेडगे, सुरेश भोईर, राजेंद्र गावडे, माजी नगरसेविका अश्विनी चिंचवडे व माजी स्वीकृत सदस्य विठ्ठल भोईर, सामाजिक कार्यकर्ते हर्षद नढे, अजित कुलथे, कैलास सानप, प्रदीप सायकर, शिवम डांगे, नूतन चव्हाण, सुरेखा जाधव, महेश मिरजकर, आदित्य रेवतकर, अतुल कांबळे या प्रमुख कार्यकर्त्यांसह चिंचवडकर नागरिक सहभागी झाले होते.

# वैष्णवीच्या आरोपींना पोलीस काही तासात अटक करतील

## - उदय सामंत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : वैष्णवी सोबत घडलेल्या घटना ही अमानवी आहे. या प्रकरणी पोलीस आरोपींना काही तासात जेरबंद करतील. पुढारी आहे म्हणून मला सर्व काही करण्याची मुभा आहे. ही वृत्ती पोलीस मोडून काढतील. असा विश्वास उद्योगमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला आहे.

सामंत यांनी कस्पटे कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केलं. यावेळी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे, मोहन कस्पटे, पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, पोलीस निरीक्षक कोल्हटकर उपस्थित होते.मंत्री उदय सामंत म्हणाले, कस्पटे कुटुंबाची भेट घेतली आहे. पोलीस काही तासात आरोपींना अटक करतील. वैष्णवीसोबत अमानुष घटना घडली आहे. आरोपींच्या शोधासाठी सहा पथक रवाना करण्यात आली आहे. आरोपींना कठोर शिक्षा व्हावी हीच आमची भूमिका आहे. पुन्हा कुणी अस धाडस करणार नाही. अशी शिक्षा आरोपींना दिली जाईल.सुदैवाने दहा महिन्याच बाळ सुखरूप आजी-आजोबांकडे आलं आहे. अशा गोष्टींचा समाजावर परिणाम होतो. या कुटुंबावर आघात झाला आहे.

अशी घटना पुन्हा होणार नाही. यासाठी पोलीस काळजी घेतील.

कुठल्याही पक्षाचा कार्यकर्ता असला म्हणजे अस करण्याचं सर्टिफिकेट दिलेलं नाही. पुढारी असला म्हणजे अशी करण्याची मुभा नाही. हे सगळं आता पोलीस मोडीत काढतील.

# बांधकाम व्यावसायिकाकडून पाच कोटीची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्याकडून मंजूर परवानगीपेक्षा अधिक मजल्यांच्या बांधकामासाठी परवानगी असल्याचे दाखवून ग्राहकांकडून पाच कोटी ३७ लाख रुपये घेत कोणतेही बांधकाम न करता फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बाणेर येथे हा प्रकार घडला.निखिल ज्ञानेश्वर फालक (वय ३२, रा. हिंजवडी) यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका महिलेसह तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी बांधकाम प्रकल्पासाठी पीएमआरडीएकडून चार मजल्यांची परवानगी घेतली आहे. तसेच दुसऱ्या एका प्रकल्पासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेची पाच मजल्यापर्यंत बांधकाम करण्याची परवानगी घेतली आहे. असे असताना त्यांनी बांधकाम प्रकल्पाबाबत पूर्ण माहिती न देता ग्राहकांना दहा मजल्यापर्यंत परवानगी प्राप्त करण्यात येत असल्याची खोटी माहिती दिली. प्रत्यक्षात कोणतेही बांधकाम पूर्ण न करता फालक आणि इतर ग्राहकांकडून घेतलेली रक्कम परत न करता तसेच गुंतवणूकदार यांच्याशी कोणताही रजिस्टर नोंदणी विक्री करार न करता रक्कम स्वत:च्या फायद्यासाठी वापरून फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968